27-01-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 01/26/2025 11:08 PM Page 1



# मेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना

## प्रा. गजानन मांद्रेकर : हणखणे शासकीय हायस्कूलच्या बाल आनंद मेळाव्याला प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २६ :** या मेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना नक्कीच चालना मिळेल. सहभागी विद्यार्थी या बाल आनंद मेळाव्यातून नवीन स्वप्ने घेऊन जातील व त्याद्वारे आपल्या भावी जीवनात नक्कीच उंच भरारी मारतील. यातच खऱ्या अर्थाने या बाल आनंद मेळाव्याची पूर्तता ठरेल, असे गजानन मांद्रेकर यांनी सांगितले.

गोवा राज्य सरकार संचालित गोवा मराठी अकादमी, पणजी व शासकीय माध्यमिक विद्यालय हनखणे पेडणे यांच्या संयुक्त विद्यमानतून आयोजित केलेल्या बाल आनंद मेळाव्याला परिसरातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील जवळ



**हणखणे : उद्घाटन प्रसंगी प्रा. गजानन मांद्रेकर, मुख्याध्यापक नरेंद्र नाईक व इतर.**

जवळ ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उदंड प्रतिसाद दिला.

या मेळाव्याचे उद्‌घटन गोवा मराठी अकादमीचे केंद्रीय कार्यकारीणी सदस्य तथा पेडणे तालुका समन्वयक गजानन मांद्रेकर यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र नाईक, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अश्विनी घाटवळ, तसेच विविध सहभागी विद्यालयांचे प्रतिनिधी शिक्षक उपस्थित होते.

या बाल आनंद मेळाव्याचे विशेष म्हणजे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांसाठी मेहंदी रेखाटन स्पर्धा, स्टोन पेंटिंग,रांगोळी स्पर्धा आणि लोक नृत्य स्पर्धा तर प्राथमिक विद्यार्थी गटासाठी चित्र रंगविणे, कथाकथन, हावभावासहित कविता गायन स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, कागदी हस्तकला स्पर्धा, भारतीय संस्कृतीवर आधारित नृत्य स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

शासकीय माध्यमिक विद्यालय हनखणे यांच्या शेजारील परिसरातील विद्यालयांचे ४५० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकानी या कार्यक्रमात उपस्थिती लावून सहभाग घेतला. तब्बल सहा तास चाललेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा मध्ये भाग घेऊन धमाल केली. विविध स्पर्धात अधिकाधिक बक्षिसे प्राप्त करून प्राथमिक विभागामध्ये सरकारी प्राथमिक विद्यालय, हनखणे हे विद्यालय सर्वोत्कृष्ट विद्यालय ठरले. तर माध्यमिक गटात शारदा हायस्कूल, भेंडाले नागझर हे विद्यालय सर्वोत्कृष्ट ठरले. स्पर्धांच्या शेवटी विजेत्या स्पर्धकांना मुख्याध्यापक नरेंद्र नाईक, ज्येष्ठ शिक्षिका सौ. नीता पेडणेकर, शाळा समूह समितीचे अध्यक्ष सौ अश्विनी घाटवळ, उपाध्यक्ष श्याम नाईक तसेच स्पर्धांचे परीक्षक धनंजय परब, प्रदीप मिशाळ, सौ. रूपा नाईक, कार्यक्रम संयोजक शिक्षक रामा नाईक यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक नरेंद्र नाईक यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत गुलाब पुष्प व पुस्तक भेट देऊन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका मनीषा आडेलकर यांनी केले तर स्पर्धांचे सूत्रसंचालन शिक्षिक रामा बिचोलकर, नीता पेडणेकर यांनी केले. शिक्षक राजकुमार देसाई यांनी आभार मानले.

पान १ वरून

## पॅलेस्टिनींच्या संपूर्ण स्थलांतराचा डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रस्ताव

विशेषतः नक्बा किंवा आपत्ती, जी १९४८ मध्ये इस्रायलच्या स्थापनेदरम्यान पॅलेस्टिनींच्या मोठ्या प्रमाणात विस्थापनाचा संदर्भ देते. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्याला इस्रायलने दिलेल्या लष्करी प्रतिसादानंतर गाझामधील परिस्थिती अजूनही गंभीर आहे, ज्यामध्ये १,२०० इस्रायली मृत्युमुखी पडले आणि २५० ओलिसांना पकडण्यात आले. गाझाच्या आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, त्यानंतरच्या इस्रायली हवाई हल्ले आणि जमिनीवरील हल्ल्यात ४७,००० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले आहेत, ज्यामुळे नरसंहार आणि युद्ध गुन्ह्यांचे जागतिक आरोप सुरू झाले आहेत. आठवड्यापूर्वी झालेल्या युद्धबंदीमुळे मर्यादित विश्रांती मिळाली आहे, ज्यामुळे काही इस्रायली ओलिस आणि पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका झाली आहे. तथापि, ट्रम्पच्या प्रस्तावाच्या संभाव्य परिणामांमुळे प्रदेशात तणाव कायम आहे. दीर्घकाळ चाललेला इस्रायली-पॅलेस्टिनी संघर्ष आणखी एक वादग्रस्त वळण घेत असल्याने आंतरराष्ट्रीय समुदाय या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.



## गुरुवर्य कृष्णाजी वराडकर यांना मरणोत्तर बांदा ग्रामरत्न पुरस्कार

टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि. २६ : बांदा येथील खेमराज प्रशालेचे माजी मुख्याध्यापक तथा विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या घडवणारे आदर्श शिस्तप्रिय शिक्षक कै. कृष्णाजी वराडकर यांना बांदा ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात येणारा बांदा ग्रामरत्न पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात आला. ७६ व्या प्रजासत्ताक दिनी बांदा गांधी चौक येथे गावाच्या एकत्रित झेंडावंदन सोहळ्यात बांदा सरपंच प्रियांका नाईक आणि उपसरपंच आबा धारगळकर यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कै. वराडकर सर यांच्या वतीने त्यांचे सुपुत्र सुहास वराडकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी या पुरस्काराची संकल्पना मांडणारे ग्रामस्थ नागेश सावंत व्यासपीठावर उपस्थित होते.

गत वर्ष २०२४ पासून बांदा ग्रामपंचायतीतर्फे हा बांदा ग्रामरत्न पुरस्कार देण्यास आरंभ झाला आहे .गतवर्षी जागतिक आरोग्य संघटनेचे माजी सल्लागार डॉ. बी. बी. गायतोंडे यांना पुरस्कार मारणोत्तर प्रदान करण्यात आला होता. यावर्षी गुरुवर्य वराडकर वयाची शंभरी पूर्ण करत होते. त्यांचे नाव पुरस्कार साठी आधीच निश्चित करण्यात आले होते. परंतु दुर्दैवाने नुकतेच त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांना हा पुरस्कार मरणोत्तर देण्यात आला.

शाल, श्रीफळ,स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रूपाली शिरसाट यांनी या सन्मान पत्राचे वाचन केले. समस्त ग्रामस्थांनी यावेळी टाळ्या वाजवून वराडकर सरांच्या कार्याला मानवंदना दिली.



**मडगाव : प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभव नाईक, प्राचार्य राजीव देसाई, उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक केशव नाईक, विद्यार्थी इथन व मान्यवर.**

# दामोदर उच्च माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात


■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६ :** श्री दामोदर उच्च माध्यमिक विद्यालयात ७५वा प्रजासत्ताक दिन जल्लोषात साजरा करण्यात आला.श्री दामोदर उच्च माध्यमिक विद्यालय विज्ञान शाखा कोंब, मडगाव येथे शाळेच्या प्रांगणात ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी कु. इथन कौटिन्हो हे होते. ध्वजवंदन, त्यानंतर राष्ट्रगीत गायले गेले. आपल्या भाषणात त्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल आणि भारतीय संविधानाचा मसुदा कसा तयार केला गेला याबद्दल सांगितले. आपल्या समाजाला भेडसावणाऱ्या विविध समस्या आणि आपण त्या थोड्या व्यावहारिक मार्गांनी कशा सोडवू शकतो याबद्दल त्यांनी विषद केले.प्राचार्य श्री. राजीव देसाई यांनीही यावेळी बहुमुल्य असे प्रभावी वक्तव्य केले आणि शिक्षकांनी जबाबदारी पेलण्यासाठी तरुण मनाला घडवण्याचे आवाहन केले. सत्य बोलणे, स्वच्छता राखणे या महात्मा गांधींच्या तत्त्वांचे पालन करा, असे ही आवाहन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाज कार्यकर्ते प्रभव नाईक, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. राजीव देसाई, मुख्याध्यापक श्री. केशव नाईक, प्राथमिक शाळेच्या प्रभारी श्रीमती उज्वला गोवेकर, शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थी आणि पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.उच्च माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी एक सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केला ज्यामध्ये भाषणे, एकपात्री, एकल आणि सामूहिक गायन यांचा समावेश होता.सूत्रसंचालन कु. रिया कुट्टी आणि कु. अनाया रिबेलो यांनी केले तर आभार कु ग्रीष्मा भगत यांनी मानल्याची माहिती प्रसिद्ध पत्रकातून देण्यात आली.

# धेंपे वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय बहुभाषिक कविसंमेलन



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २६ :** इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा (आयएमबी) आणि कुजिरा बांबोळी येथील एस. एस. धेंपे वाणिज्य तथा अर्थशास्त्र महविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने धेंपे महाविद्यालयाच्या सभगृहात भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रीय बहुभाषिक कविसंमेलन होणार आहे. यात विविध राज्यातील कवी मराठी, कोकणी, हिंदी, ऊर्दू, बंगाली, संस्कृत, इंग्रजी, कन्नड, भोजपुरी अशा भाषांतील कविता सादर करणार आहेत. मराठीतील ख्यातनाम कवी तथा वात्रटिकाकार रामदास फुटाणे हे कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषवतील. धेंपे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज कामत व आयएमबी चे अध्यक्ष दशरथ परब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. कविसंमेलनात महाराष्ट्रातील प्रा.गोविंद काजरेकर, गोव्यातील चित्रसेन शबाब व सोनाली सावळदेसाई परब मराठी, माधव बोरकर, निलबा खांडेकर, ग्लोदालुप डायस कोकणी, कोलकाता येथील डॉ. सोमा बंडोपाध्याय बंगाली, कर्नाटक येथील कृष्णा बडीगर कन्नड, बिहारचे संतोष कुमार भोजपुरी, गोव्याच्या सुनीता फडणीस संस्कृत, महाराष्ट्रातील जमालादुद्दीन चिस्ती ऊर्दू, बंगळुरू येथील अनुराधा सिंग हिन्दी तर ब्रायन मेंडोंसा इंग्रजी मराठी सादर करतील.

### कला गौरव पुरस्काराचे मानकरी

**प्रदीप राजाराम परब, गजानन पांडुरंग चोडणकर, सिंधू चंद्रकांत परब, चिदानंद दत्ताराम मडकईकर (नाटक), रेखा पौडवाल, दादू पांडुरंग परब, सरस्वती दामोदर नाईक (साहित्य), मिंगेल जेकब कारमो लुईस फर्नांडीस ऊर्फ प्रिन्स जेकब जॉन वाझ , आंतोनिओ शावियेर कोरैया (तियात्र), अशोक मांद्रेकर, गजानन फोंडगी पागी, रत्नप्रभा संदीप नाईक, श्रीधर सावळो सतरकर (भजन), आग्नेलो संतान दा सिल्वा (संगीत), कल्याण भागू देविदास, आंतोनियो वाझ (लोक कला), श्रीकांत पंढरी सतरकर (हस्तकला), मधू नाईक गावकर (शिल्प), नंदकिशोर नाईक (पेंटिंग)**

**कला वृध्दी पुरस्काराचे मानकरी**

उदय साजी तिळवे, योगेश गजानन कापडी, मिनल दामोदर कामत, अविनाश कुंकळकर (साहित्य), प्रदीप आनंद नाईक (तियात्र), विष्णू धना नाईक (भजन), अना लुएला डिसोझा फोर्टिस ऊर्फ लुलू फोर्टिस (संगीत), उल्हास नारायण केरकर, विजय श्रीधर देसाई (लोककला), गिरीश रतन नावेलकर (हस्तकला), कालिदास काशिनाथ सातार्डेकर



**हरमल : रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन करताना सरपंच संतान फर्नांडिस. सोबत चित्रा वायंगणकर, संतोष कोरकणकर, डॉ. अदिती खोरलेकार, साईदास नाईक, वरद परब, राघोबा गावडे व विश्वराज नाईक.**

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान : चित्रा वायंगणकर

■ टीम दैनिक हेराल्ड

### मोहन फाऊंडेशनतर्फे चिकित्सा शिबिराचे उद्‌घाट

**हरमल, दि. २६ :** आरोग्याची नियमित तपासणी करून प्रत्येकजण तंदुरुस्त राहण्यासाठी सजग असतो. त्याही पेक्षा रक्तदान दुसऱ्यांचे प्राण व जीव वाचवतो, हे महान कार्य असून रक्तदान सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. पुण्याईचे काम असल्याने युवकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन बांबोळी गोवा वैद्यकीय महाविद्यालयाच्या ज्येष्ठ परिचारिका चित्रा सर्वेश वायंगणकर यांनी व्यक्त केले.

केआरींग सौलस, युथ ऑफ हरमल, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान व मोहन फाऊंडेशनतर्फे चिकित्सा शिबिराचे उद्‌घटन गणेशोत्सव सभागृहात करण्यात आले. त्या शिबिराच्या उद्‌घाटक प्रमुख पाहुण्या वायंगणकर बोलत होत्या. विशेषत हृदय रोग शस्त्रक्रियेत शुद्ध व ताज्या रक्ताची निकड असते, अशावेळी इस्पितळात कार्डचा उपयोग होत नसतो असे नव्हे. परंतु शस्त्रक्रियेसाठी ताज्या रक्ताची गरज असते. रक्तदात्यांनी पूण्याईचे काम मानून सदोदित सहकार्य करावे. हरमलच्या युवकांनी श्रेष्ठ कार्यक्रम घडवून आणल्याबद्दल अभिनंदन असल्याचे परिचारिका वायंगणकर यांनी व्यक्त केले.

गेली कित्येक वर्षे सार्वजनिक मंडळ व ह्या गावातील संस्था रक्तदान शिबिराचे आयोजन करून एक आदर्श कार्य चालू केले, त्याबद्दल कौतुक आहे.युवकांनी अशा विधायक कार्यात सहभागी व्हावे व गाँव,राज्य व देशाची प्रगती करावी.येत्या शिवजयंती उत्सवात युवकांनी भाग घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व भावना कृतीत आणण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी व्यक्त केले.

यावेळी बॉडीबिल्डर वरद परब यांचे खास कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास जिल्हा इस्पिततळाच्या डॉ अदिती खोरलेकर, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर,मांद्रे कायदा सल्ला केंद्राचे विश्वराज नाईक, मोहन फाऊंडेशनचे डॉ. गाब्रियल व राघोबा गावडे उपस्थित होते. यावेळी सुभाष वस्त, अथर्वा बांधकर, शौनक पै आदींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन साईदास नाईक यांनी केले. तर राघोबा गावडे यांनी आभार मानले.

## म्हापसा शिगमोत्सव समितीच्या अध्यक्षपदी उपसभापती ज्योशुआ डिसोझा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २६ :** म्हापसा शिगमोत्सव समितीच्या अध्यक्षपदी उपसभापती ज्योशुआ डिसोझा तर कार्याध्यक्षपदी डॉ. गुरुदास नाटेकर यावर्षी म्हापसा येथे चित्ररथ मिरवणूक रविवार दि. २३ मार्च २०२५ आयोजित करण्यात आली असून बाकीचा कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. यावर्षी म्हापसा येथे साजरा होणाऱ्या शिगमोत्सवासाठी खालीलप्रमाणे समिती निवडण्यात आलेली आहे. अध्यक्ष - ज्योशुआ पीटर डिसोजा, उपसभापती, आमदार, म्हापसा मतदारसंघ, उपाध्यक्षा - डॉ. नूतन बिचोलकर, नगराध्यक्षा - म्हापसा नगरपालिका कार्यकारी मंडळ - कार्यकारी अध्यक्ष - डॉ. गुरुदास भा. नाटेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष - डॉ. तारक आरोलकर. कार्यकारी उपाध्यक्ष - आनंद भाईडकर, बार्बरा कॅरास्को, शशांक नार्वेकर, कायल ब्रागांझा, शुभांगी वायगणकर, किशोरी कोरगावकर, आशीर्वाद खोर्जुवेकर, प्रिया मिशाळ, कमल डिसोजा, स्वप्नील शिरोडकर, विराज फडके, अन्वी कोरगावकर, सुधीर कांदोळकर, प्रकाश भिवशेट, (नगरसेवक, म्हापसा नगरपालिका). चिटणीस - साईनाथ राऊळ. उप-चिटणीस - सुशांत हरमलकर, खजिनदार -यशवंत (बाबा). गवंडळकर, उप- खजिनदार - चंद्रशेखर बेनकर व विकास आरोलकर. सल्लागार समिती - राजेंद्र पानकर, प्रसन्ना बुर्ये, मोहन पु. काणेकर, दामोदर (बाबू) नाटेकर, विलास पानकर, सुशांत पेडणेकर, अवधूत स. नार्वेकर, महादेव सा. नाटेकर, अनिल भर्तू, शिवानंद म. धावजेकर, दिनेश पानकर सभासद: अजित मांद्रेकर,सागर श्री. नार्वेकर, अच्युत वेर्णेकर, रमेश रा. शेट मणेरकर, सुहास सिरसाट, अभी गवंडळकर, सागर गो. नाईक, विनायक दिवकर, भालचंद्र नाटेकर, संजय मिशाळ, महेश भिवशेट, सोमनाथ नाईक, विशांत पानकर, सोमनाथ नाटेकर, निळकंठ शेट, मिलिंद महाले, भारत तोरस्कर, दत्ताराम (बाप्पा) नाटेकर, कुंदल नाटेकर, हर्षद स्वार, सलील शिरोडकर, यशवंत शेट्ये, रोहित नाटेकर, उदय मुंज, गुरुदास वायगणकर, श्यामसुंदर पेडणेकर ,प्रज्योत खेडेकर,योगेश खेडेकर, साईश सावंत, सागर कांबळी, अनिश जोशी, संदेश सिरसाट, चंदन गोपी नाईक, नितीन पेडणेकर, राजेश शेट्ये, दुर्गेश तिळणेकर, गौरेश पेडणेकर, सिद्धाशु साळवी, राजेश तुयेकर, सिद्धांत परब, रितेश मणेरकर, सिद्धार्थ बोरकर, सप्रेष कळंगुटकर, पूर्णय रिवणकर, श्रेयश वराडकर, संदेश रेडकर, प्रथमेश वायगंणकर, भावेश आरोलकर, रवींद्र फोगेरी,विवेक नाटेकर,अमेय नाटेकर, दीपक तिळवे, अरुण गावंडळकर, विनोद पालयेकर, वरूण नाईक, बबल धारगळकर, भानुदास गडेकर, सनी कळंगुटकर, प्रेमानंद आर्लेकर, सिद्धार्थ शेट, प्रशांत सरवणकर.

प्रसिद्धी समिती - प्रकाश धुमाळ, नारायण राठवड, सुदेश आर्लेकर, रमेश नाईक, तुषार टोपले, अनिल लाड, गिरिश मांद्रेकर, प्रसाद म्हाम्बरे, आग्नेल परेरा, उमेश झर्मेकर, रेणुका तालेगावकर , अर्पिता श्रीवास्तव, संदीप कामूलकर, प्रसाद पिंगुळीकर, शामसुंदर फडते, बाबू पिंगुळीकर, योगेश मिराशी, कमलाकर हुमरस्कर, प्रकाश गडेकर, सौरव शिरोडकर, गौतम शिरोडकर, डॅनव्हर डिसौजा, भारत बेतकेकर, नितिक्षा गावकर, अस्मिता पोळजी, साईप्रसाद कुबडे, सागर लवंदे, स्नेहा हसोटीकर.


GOVERNMENT OF GOA
OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/SEXECUTION, NORTH GOA DISTRICT,
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa

ABN Case No.: ARCS/VPK/HONDA/2024/ABN/2246
VPK Urban Co-operative Credit Society Ltd.
Honda Branch, Honda Sattari- Goa.
........Disputant
V/s
1.Mr.Rupesh Damodar Naik
H.No.45 Sonshi Honda Sattari Goa
2.Mr.Rajan Haridas Korgaonkar
H.No.35 Sonshi Honda Sattari Goa
3.Mr.Shamba Bhaskar Painaik
H.No529 Chiknem Kudne Bicholim Goa
.......Opponents

**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**

To,
The Opponent No.3

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs.366315.50** (Rupees Three Lakh Sixty Six Thousand Three Hundred Fifteen and paise Fifty Only with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Insufficient Address** returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 24.01.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **25.02.2025 at 03.00 p.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 24th day of January 2025.

SEAL
Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.

**Place:** Ponda
**Date:** 24.01.2025


# 'सदाबहार गीतों कि मॅहफिल' कार्यक्रम रवींद्र भवन साखळी येथे रंगला

■ टीम दैनिक हेराल्ड




**नावेली, दि. २६ :** साखळीच्या रवींद्र भवनमध्ये नविन संचालक मंडळ स्थापन झाल्या पासुन पहिल्यांदाच पं मनोहरबुवा शिरगांवकर सभागृहांत यशप्रभा निर्मित! सदाबहार गीतों कि मॅहफिल! हा जुन्या हिंदि चित्रपट गीतांचा कार्यक्रम सुप्रसिध्द गायक आणि संगितकार श्री पुरुषोत्तम पै आणि सह कलाकारांनी सादर केला. प्रमुख अतिथी म्हणुन रवींद्र भवनचे उपाध्यक्ष श्री दत्ताराम चिमुलकर होते. तसंच संचालक मंडळी सदस्य होते, यशप्रभाच्या ज्येष्ठ सदस्या तेजस्विनी केरकर, श्री हनुमान मंदिरच्या वाळपईच्या अध्यक्षा रोशन देसाई आणी यशप्रभाचे बाकी प्रायोजक, गायक, वादक मंडळी समई प्रज्वलनासाठी उपस्थित होते.

यशप्रभाचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम पै यांनी सर्वांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत केले आणि सर्वांना संस्थेचे मानचिन्ह प्रदान केले. उपाध्यक्ष श्री दत्ताराम ने भाषण केले आणि अध्यक्ष पुरुषोत्तम ने आभार मानले. सदाबहार गीतों कि मॅहफिल या कार्यक्रमाची सुरुवात विरुद्ध या चित्रपटातील गणनायकाय गणदेवताय या गीताने श्री पुरुषोत्तम पै यांनी केली. त्यानंतर पद्मजा काकोडकर, हर्षद कुंदे, दिगेश पै आंगले, अजय नाडकर्णी आणि श्वेता मांद्रेकर यांनी अनेक जुनी गाणी गाऊन प्रक्षकांना खिळवुन धरले. सव्वा दोन तासाच्या या कार्यक्रमात प्रेक्षकांना अनेक जुनी गाणी ऐकण्यास मिळाली.अनेक जुनी द्वंद्व गीते ऐकण्यास मिळाली, आणि प्रेक्षकांनी आनंद लुटला. पुरुषोत्तम ने सिने मे जलन, चॉदि जैसा, या गझल सादर केल्या. तशीच कहीं दूर जब, हमे तुमसे प्यार, तसंच श्वेता सोबत दिल कि नजर से, आॅखो ही आॅखो मे ईशारा हो गया ही गीते गायली. पद्मजा ने कहीं झुम झुम , जमीन से आसमा हे अजय बरोबर, तर पिया पिया हे गीत दिगेश च्या साथीने सादर केलं. हर्षद ने सामने ये कौन, ये श्याम मस्तानी, केह दु तुम्हे हे गीत श्वेता बरोबर गायलं तसंच ये दोस्ती हम नही हे अजय सोबत गायलं. श्वेता ने मेरा नाम चिन चिन चु ,ये दिल मुझे बताता दे तसंच अच्छा जी मै हे दिगेश सोबत तर गोरे गोरे ओ बाकि छोरे हे गीत पद्मजा सोबत सादर केल. दिगेश ने चला जाता हुॅ, तसंच झुम झुम झुमरु, खैके पान बनारस वाले तसंच बाबु समझो ईशारा हे हर्षद सोबत गायलं. अजय ने जिवन के दिन गायल... एकंदरीत साखळीच्या प्रेक्षकांना एक संगीताची मेजवानीच मिळाली. असा तुमचा कार्यक्रम परत होवो आसा एकंदरीत रसिकांचा सुर होता. या कार्यक्रमात संगीताची साथ केली होती हेमंत नाईक, विनय नाईक, अतुल गुरव, प्रथमेश सावंत, जितेंद्र तांडेल आणि श्री संघर्ष पालेकर या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन समृद्धि गणपुले यांनी केले.


बारावा दिवस

स्व. प्रसाद तुकाराम कांबळे

जन्म- ०४-०२-१९९७ मृत्यू- १६-०१-२०२५



तो हसरा चेहरा, नाही कोणाला दुखवले ।
मनाचा तो भोळेपणा, नाही केला मोठेपणा।
सोडूनी गेला अचानक नव्हती कुणालाही याची जाण ।
पुन्हा परतूनी यावेस हीच आमची अपेक्षा ।
देव तुझ्या आत्म्यास शांती देवो हीच प्रार्थना.

आई/बाबा- प्रभावती तुकाराम कांबळे
काकी/काका- वासंती (स्व. वसंत) कांबळे
भावजय/भाऊ- पूजा प्रज्योत कांबळे
सचिता सचिन कांबळे
भाऊ- स्वप्निल, बहीण- सरीता
बहीण/भावोजी- कल्पना उल्हास कोरगावकर, पुष्पा अजित पवार, ज्योती अक्षय मलिक, उज्वला गोविंद उगवेकर
पुतणे- प्रयुश/देवांश
भाचा- गौरव